स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 27–09–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 3. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 4. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 5. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 6. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 7. | सौ. ठरावा विकास खोब्रागडे | सदस्या |
| 8. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 9. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 11. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 12. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 13. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 14. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |
| 15. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 16. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. श्याम वर्धने, आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 125</u> :— नागपूर महानगरपालिका अंतर्गत BSUP-JNNURM योजने अंतर्गत केंद्र शासनाचे 130 CSMC बैठक दि. 23.03.2013 अन्वये मंजूर व महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागाचे दि. 6जुलै 2013 चे पत्रान्वये मंजूर घरांचे बांधकाम करण्याचे व निविदा मंजूर करण्याचे व त्यासाठी म.न.पा. चा हिस्सा रु. 6.86 कोटीची तरतुद मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 126</u> :— प्रभाग68, नरेंद्रनगर येथील पी. एम. जी. सोसायटी, येथील प्रस्तावित उद्यानात विविध विकास कामे करण्याचे रु.49,99,905/—च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करुन कामनिहाय निविदा मागविण्यास तसेच या कामाकरिता वास्तुविशारद मे.मडाव कंसलटंट इंडीया प्रायव्हेट लिमिटेड यांची म.न.पा. चे निर्धारित दरानुसार वास्तुविषयक सेवा घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 127</u> :— नागपूर शहरात निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर भांडेवाडी येथील मलनि:सारण केन्द्राचे पुर्नवसन करुन २०० द.ल.लि. पर्यंत क्षमता वाढविणे.

नागपूर शहरात दररोज अंदाजे ३५० ते ४०० द.ल.लि. सांडपाण्याची निर्मिती होते. मध्य नागपूर हा दाट लोकवस्ती असलेला भाग असून त्याकरिता भुयारी गटार योजना अस्तित्वात आहे. या भागातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या शुध्दीकरणाकरिता भांडेवाडी येथे मलशुध्दीकरण केन्द्र बांधण्यात आले असून तेथे ७०—८० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्याचे शुध्दीकरण होते. म्हणजेच २८० ते ३२० द. ल. लि. सांडपाणी नाग, पिवळी व पोरा नदीत प्रक्रिया न करता सोडावे लागते. या सांडपाण्यामुळे नद्यांमध्ये होणाऱ्या प्रदुषणाबाबतची माहीती दि. ११.०५.२०१० च्या स्थानिक वृत्तपत्रिकेत **(The Hitavada)** प्रकाशीत झाले. या बातमीला मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने **Suo moto** जनहित याचिका क्र. २१/२०१० लोकहितास्तव प्रकरण म्हणून दाखल करुन घेतले. त्याचप्रमाणे श्री प्रशांत विठ्ठलराव दांडेकर यांची जनहित याचिका क्र. ३०/२०१० आणि धार्मिक फाउंडेशन व इतर यांनी सुध्दा जनहित याचिका क्र. ३८/२०१० मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठात याचिका दाखल केलेली आहे. या तिन्ही याचिकांना मा. उच्च न्यायालयाने एकत्रिकरणानंतर जनहित याचिका क्र. ३८/२०१० मध्ये समाविष्ठ केले आहे.

(१) जनहित याचिका क्र. ३८/२०१० संदर्भात दि. २५.११.२०१० रोजी मा. उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेत.

**"The Nagpur Municipal Corporation is thus called upon to make a statement as to what steps are being taken by them to comply with the**

**directions. In the very same notice the Corporation is called upon to furnish bank guarantee of Rs. 20,00,000/- for a period of fourteen months and Rs. 10,00,000/- for a period of six months. We are informed that the said bank guarantee has not yet been furnished by the Corporation. The Corporation is directed to disclose as to when are they going to comply with the said condition. So far as the question of disposal of sewage is concerned, the Corporation is also expected to disclose on oath as to their future plans in this behalf. The affidavit should be under the signature of Municipal Commissioner so that the matter can be looked into in its proper perspective".**

मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मा. आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे लोकसहभागावर प्रकल्प घेण्यासंदर्भात दि. ३०.११.२०१० रोजी शपथपत्र सादर केले. दरम्यानच्या काळात सदर कामाचे **EOI** मागविण्यात आले. शपथपत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे.

"I say that the Respondent Municipal Corporation has alternatively initiated process of establishment of Sewage Effluent Treatment in the city on Public Private Partnership (PPP)/Design Built Operate and Transfer (DBOT) basis for reuse by Potential Customers in City. The Respondent Municipal Corporation had published advertisement on 4th September 2010 for Expression of Interest for the Project. As many as 19 firms have shown interest in the project. The Respondent Municipal Corporation intends to persue the matter further, however it shall take some time."

(२) परत दि. १२–१३ जानेवारी २०११ ला मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशामध्ये नीरी या संस्थेने नाग नदी, कन्हान नदी व वैनगंगा नदीमध्ये होत असलेल्या प्रदुषणाचे मुल्यांकन करुन रिपोर्ट सादर करावा असे निर्देश दिले. नीरी या संस्थेने एप्रिल २०११ ला सादर केलेल्या अहवालामध्ये दिलेल्या शिफारशीमध्ये (Recommendation) पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.

"The sewage treatment process may be similar to the existing process at STP, Bhandewadi, based on primary treatment followed by aerobic biological treatment to reduce suspended solids & organic pollution. It is recommended that disinfection of treated sewage before discharge must be practiced. Since the treated sewage from STP Bhandewadi contains nutrients (Total Kjeldahl Nitrogen – 45 mg/l and Phosphate – 6.6 mg/l), the discharge of treated sewage may lead to eutrophicaiton of water bodies in the long run. Therefore, a treatment facility at the tertiary stage is necessary for reducing nutrient concentrations in the final treated effluent."

(३) मा. उच्च न्यायालयाचे आदेश दि. २५.०२.२०११ अन्वये गोसीखुर्द धरणातील पाण्याची शुध्दता पिण्याच्या व शेतीयुक्त नसल्याने धरणाचे गेटस् उघडून पाणी सोडण्याच्या संदर्भात निर्णय घेण्याचे आदेश निर्गमित केले, तसेच महाराष्ट्र शासना च्या दि.

१०.०५.२०११ पत्रान्वये केन्द्रशासनाला सादर केलेल्या उत्तर सिवरेज झोन च्या विस्तृत प्रकल्प अहवाल निधि अभावी नाकारण्यात येवून परत पाठविण्यात आला.

यावर मनपाने दि. २१.०३.२०१२ ला सादर केलेल्या पुरक शपथपत्रामध्ये प्रकल्पाबाबत पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे.

"I say that in the meanwhile the Respondent Municipal Corporation has taken steps to enhance capacity of existing 100 MLD STP at Bhandewadi to 200 MLD on Public Private Partnership basis. For this purpose the Municipal Corporation invited expression of interest from the interested parties. About 19 responsive bids were received. First pre-bid meeting of the Responsive bidders was held on 9th December 2011 and the second pre-bid meeting is to be held on 19th March 2012."

(४) परत यावर मा. उच्च न्यायालयाने दि. ११.०५.२०१२ ला पुढीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

It is submitted on behalf of the petitioner that the water in the Gosikhurd Dam is polluted mainly due to the inflow of sewage from the Nag River, as four hundred cubic million liters of sewage is discharged in the Nag River every day. This Court had by an order dated 12/13th of January, 2011 directed the Municipal Corporation to take steps in the matter to ensure that the sewage is treated. Since four sewage treatment plants are necessary for treating the sewage, the respondent No.3-Nagpur Municipal Corporation filed an affidavit on 21st of March, 2012 stating therein the steps taken by the Corporation in that regard. The Nagpur Municipal Corporation is directed to state about the progress in the matter on the next date of hearing and also inform the Court within what time the sewage plants could be functional and the sewage could be treated".

मनपाने दि. ६.७.२०१२ ला दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे.

"I say that the Respondent Municipal Corporation has submitted three Bank Guarantee amounting to Rs. One Crore to the Maharashtra Pollution Control Board (MPCB) on 4th May 2011, and thus the conditions in the show cause notice dated 6th July 2010 is also complied. I further state that in compliance of the order dated 12/13.01.2011 passed by the Hon'ble Court, the Respondent had submitted that the Municipal Corporation had submitted Detailed Project Report (DPR) in respect of South Sewage Zone to the MMRDA as per the procedure prescribed on 3rd March 2011. This fact is already stated in the affidavit dated 21st March 2011. I further say that in respect of proposed enhancement of present 100 Mld STP to 200 Mld at Bhandewadi on Private Public Participation basis the Request for Proposal (RFP) document are already issued and the last date for submission of proposal by the qualified bidders is fixed on 2nd August, 2012."

(५) सर्व बाबी लक्षात घेता व उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे मनपाने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत मान्य केले आहे तसेच हे काम करण्याकरीता खालीलप्रमाणे प्रक्रिया मनपा मार्फत करण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Calling Expression of Interest –I<br>Advertisement No. 127/PR/4.09.2010 | 4.09.2010 |
| 2 | Appointment of consultancy services for transaction advisory support – Approved by Hon’ble Municipal Commissioner | 31.05.2011 |
| 3 | Calling Expression of Interest –II<br>Advertisement No. 83/PR/24.06.2011 | 24.06.2011 |
| 4 | Submission of EOI by 19 bidders | 05.08.2011 |
| 5 | Opening of EOI | 6.08.2011 |
| 6 | Issuance of RFP documents to the Bidders<br>Vide letter No. NMC/PPC/94/2011, dt. 22.11.2011 | 22.11.2011 |
| 7 | 1st Pre-Bid meeting held on | 9.12.2011 |
| 8 | Reply to bidders queries<br>Letter no. NMC/PPC/EE(PPC)/345/2012 | 7.04.2012 |
| 9 | 2nd Pre-Bid meeting held on | 25.04.2012 |
| 10 | Revised RFP documents send on | 30.06.2012 |
| 11 | Six intending bidders have submitted their offer on<br>1) M/s. ESSAR-THEMAX-SREI, (JV), Mumbai<br>2) M/s. GHARPURE Engineers & Constructions Pvt. Ltd. – United Phosphorous Ltd., (JV) – Pune<br>3) M/s RAMKY Infrastructure, Hyderabad, India<br>4) M/s. SEW –AIPPL (JV), Hyderabad<br>5) M/s. Triveni, Engineering Industries Ltd.- Oriental Structural Engineers Pvt. Ltd. (JV), NOIDA, U.P.<br>6) M/s. Vishwaraj Infrastructure Pvt. Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (JV), Nagpur | 2.08.2012 |
| 12 | Bids were opened on | 3.09.2012 |
| 13 | Evaluation report prepared on | Sept. 2012 |
| 14 | Proposal has been submitted on | 23.10.2012 |
| 15 | State PPP approval was obtained on | 6.02.2013 |
| 16 | Proposal was forwarded to Finance Deptt. on | 28.2.2013 |
| 17 | Resubmitted to Finance Deptt. the compliances on | 26.03.2013 |
| 18 | CAFO has recommended the proposal on | 25.04.2013 |
| 19 | Queries cleared by the Deptt. | 7.06.2013 |
| 20 | Proposal submitted to Standing Committee | 9.07.2013 |

(६) हा प्रकल्प राबविण्याकरीता Deferred Payment on Annuity Basis चे आर्थिक बिंदु पुढीलप्रमाणे गृहीत धरण्यात आलेले आहे.

1. The Operator shall treat the sewage to the secondary level so as to fulfill the surface water standards laid down by MPCB. (30/100), BOD-30 mg/L @$27^0$ for three days & suspended solid 100 mg/l through proven technology.
2. Out of total capital cost, 70% will be in the form of loan (RI=13%).
3. Remaining 30% of the cost shall be invested by the bidder. (RR=18%)
4. O&M of the secondary treatment plant shall be looked after for 30 years by the operator.
5. Out of secondary treated waste water 25 Mld shall be given to NMC without any cost.
6. Remaining 175 Mld treated waste water the operator will have right to sell to the potential users.
7. Annuity ranging from Rs. 30.00 Crs to Rs. 40.00 Crs.
8. Ownership of land & the plant shall be of NMC.

महानगरपालिकेद्वारा प्रस्तावित प्रकल्पाची भांडवली गुंतवणूक (Capital Investment) अंदाजे रु. १७०.५० कोटी आहे. आर्थिक बिंदु प्रमाणे ३२ वर्षाचे अखेरीस भांडवली गुंतवणूक रु. ८१३.३० कोटी तसेच देखभाल दुरुस्ती रु. ३३२.७० कोटी लक्षात घेता मनपास एकूण रु. ११४६.०० कोटी देय राहील. याचाच अर्थ असा की मनपास प्रति वर्षी सरासरी रु. ३८.२० कोटी परत करावे लागतील. एकूण रक्कम रु. ११४६.०० ची Net Present Value रु. २९७.६० कोटी आहे.

निम्नतम निविदाकार M/s. Vishwaraj Infrastructure Ltd. Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (Joint Venture), Nagpur यांनी सादर केलेल्या निविदेप्रमाणे ३२ वर्षाचे अखेरीस त्यांचे भांडवली गुंतवणूक (Capital Investment) रु. २१६.०० कोटी असून देखभाल दुरुस्ती (O&M) करीता चा खर्च रु. ७३१.६९ कोटी असे एकूण रु. ९४७.६९ कोटीची निविदा सादर केलेली आहे. याप्रमाणे मनपास सरासरी रु. ३१.५९ कोटी प्रति वर्ष परत करावे लागतील. एकूण रक्कम रु. ९४७.६९ कोटीची Net Present Value (NPV) रु. २६१.७१ कोटी इतकी आहे. त्यांनी सादर केलेले दर पुढील पानावरील तक्त्यात दिलेले आहेत.

**Financial Bid submitted by M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur– Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (Joint Venture), Nagpur**

| Year | Annual Capital Grant Rs. In Lacs. | Gross Annual Operational Support Grant (GAOSG) Rs. In Lacs | Total Grant | Present Value Factor @ 10% | Present Value |
|---|---|---|---|---|---|

| 1 | 2 | 3 | (4)=(2)+(3) | 5 | (6)=(4)× (5) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | 10% | |
| 1 | NIL | NIL | NIL | 0.9091 | |
| 2 | NIL | NIL | NIL | 0.8264 | |
| 3 | 720 | 3342 | 4062 | 0.7513 | 3051.78 |
| 4 | 720 | 3147 | 3867 | 0.6830 | 2641.16 |
| 5 | 720 | 2970 | 3690 | 0.6209 | 2291.12 |
| 6 | 720 | 2809 | 3529 | 0.5645 | 1992.12 |
| 7 | 720 | 2911 | 3631 | 0.5132 | 1863.43 |
| 8 | 720 | 2531 | 3251 | 0.4665 | 1516.59 |
| 9 | 720 | 2645 | 3365 | 0.4241 | 1427.10 |
| 10 | 720 | 2307 | 3027 | 0.3855 | 1166.91 |
| 11 | 720 | 2212 | 2932 | 0.3505 | 1027.67 |
| 12 | 720 | 2573 | 3293 | 0.3186 | 1049.15 |
| 13 | 720 | 2059 | 2779 | 0.2897 | 805.08 |
| 14 | 720 | 2287 | 3007 | 0.2633 | 791.74 |
| 15 | 720 | 2289 | 3009 | 0.2394 | 720.35 |
| 16 | 720 | 2291 | 3011 | 0.2176 | 655.19 |
| 17 | 720 | 2175 | 2895 | 0.1978 | 572.63 |
| 18 | 720 | 2294 | 3014 | 0.1799 | 542.22 |
| 19 | 720 | 2928 | 3648 | 0.1635 | 596.45 |
| 20 | 720 | 2295 | 3015 | 0.1486 | 448.03 |
| 21 | 720 | 2296 | 3016 | 0.1351 | 407.46 |
| 22 | 720 | 2123 | 2843 | 0.1228 | 349.12 |
| 23 | 720 | 2296 | 3016 | 0.1117 | 336.89 |
| 24 | 720 | 2295 | 3015 | 0.1015 | 306.02 |
| 25 | 720 | 2295 | 3015 | 0.0923 | 278.28 |
| 26 | 720 | 2294 | 3014 | 0.0839 | 252.87 |
| 27 | 720 | 2066 | 2786 | 0.0763 | 212.57 |
| 28 | 720 | 2291 | 3011 | 0.0693 | 208.66 |
| 29 | 720 | 2290 | 3010 | 0.0630 | 189.63 |
| 30 | 720 | 2288 | 3008 | 0.0573 | 172.36 |
| 31 | 720 | 2286 | 3006 | 0.0521 | 156.61 |
| 32 | 720 | 2284 | 3004 | 0.0474 | 142.39 |
| **Total** | **21600.00** | **73169.00** | **94769.00** | | **26171.66** |

(७) हा प्रकल्प मनपाचे निधीतुन केल्यास प्रथम दोन वर्षाला रु. ८५.०० कोटी प्रति वर्ष खर्च येईल तसेच देखभाल व दुरुस्ती खर्च रु. ११.०९ कोटी प्रति वर्ष येईल.

सद्यस्थितीत मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता स्वनिधितून खर्च करणे शक्य होणार नाही या कारणास्तव मनपाद्वारे हा प्रकल्प Deferred Payment on Annuity Basis वर करण्याचा मानस आहे. यामध्ये ऑपरेटरद्वारे प्रक्रिया केलेले सांडपाणी विकण्याबाबतचे कोणतेही भरीव आश्वासन केलेले नाही. सद्यस्थितीत या प्रकल्पामुळे मनपाला आर्थिक फायदा नाही. भविष्यात पाणी विकल्या गेल्यास मनपाला आर्थिक उत्पन्न होऊ शकेल.

(८) नागपूर शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची प्राथमिक जबाबदारी मनपाची आहे. याबाबत **Maharashtra Municipal Corporation Act** मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे.

**"Chapter VI – Duties and Power of the Municipal Authorities and Officers**

*Obligatory and Discretionary duties of the Corporation*

**63. Matters to be provided for by the Corporation.**

**It shall be incumbent on the Corporation to make reasonable and adequate provision, by any mean s or measures which it is lawfully competent to it to use or to take, for each of the following matters, namely:-**

**(3) the collection, removal, treatment and disposal of sewage, offensive matter and rubbish and, if so required by the 1 [State] Government, the preparations of compost manure from such sewage, offensive matter and rubbish."**

गोसीखुर्द धरणामध्ये वाढते प्रदुषण लक्षात घेता व मा. उच्च न्यायालयाचे दि. २५.११.२०१०, १२–१३ जानेवारी २०११, २५.०२.२०११ व ११.०५.२०१२ च्या आदेशाप्रमाणे या कामाची प्रक्रिया मनपाने केली असून आपली नैतिक जवाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रकल्पातून मनपाला आर्थिक फायदा नसला तरी पर्यावरणाचे रक्षण करण्याकरीता महाराष्ट्र मुनिसिपल कॉरपोरेशन ॲक्ट मधील तरतूद क्र. ६३(३) नुसार the collection, removal, treatment, & disposal of sewage ही जबाबदारी पार पाडण्याकरीता व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार हा प्रकल्प मनपाने हाती घेण्याचे निर्णयास्तव तसेच उपरोक्त बाबी लक्षात घेता M/s. Vishwaraj Infrastructure Ltd. Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (Joint Venture), Nagpur यांनी मनपाने ठरविलेल्या आर्थिक बिंदुवर आधारित सादर केलेली रु. ९४७.६९ कोटीची ज्याची NPV रु. २६१.७२ कोटी आहे अशा निम्नतम निविदेस तसेच संपूर्ण प्रक्रियेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 128</u> :– नागपूर शहरातील सीताबर्डी विमानतळ– बुटीबोरी या

पहिल्या उन्नत मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी नागपूर सुधार प्रन्यास हि नोडल एजन्सी असून, प्रकल्पीय अहवाल डी.एम.आर.सी. (दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशन लि.) यांनी तयार केला आहे. या पहिल्या उन्नत मेट्रो छन्नमार्ग (रेल्वे) प्रकल्पास

शासनाची तत्वताः मान्यता असून प्रकल्पाचे अहवालाची प्रमुख वैशिष्टये पूढीलप्रमाणे आहे.

| रेखांकन | विस्तृत मार्ग |
|---|---|
| रेखांकन क्र. 1 – उत्तर – दक्षिण कॉरीडोअर लांबी 21.60 कि.मी. | आटोमोटिव्ह चौक, कामठी रोड, वर्धा रोड, व्हेरायटी चौक ते अभ्यंकर रोड, हम्पॅर्ड रोड, रहाटे कॉलनी, वर्धा रोड, खामला रोड, एअरपोर्ट मिहान एरिया |
| रेखांकन क्र. 2 – पूर्व – पश्चिम कॉरीडोअर लांबी 18.20 कि.मी. | प्रजापती नगर, सेंट्रल एव्हेन्यु रोड, रेल्वे फिडर रोड, मुंजे चौक, झांसी रानी चौक, नॉर्थ अंबाझरी रोड, हिंगणा रोड, लोकमान्य नगर. |

वरील प्रमाणे या प्रकल्पांतर्गतच्या कॉरीडोअरची लांबी 39.81 कि.मी. असून यापैकी 3 कि.मी. लांबी भूमिगत आहे. डी.एम.आर.सी. (दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.) च्या सादर प्रकल्प अहवालानुसार जर सन 2013–14 मध्ये प्रकल्पाचे काम सुरु झाल्यास सन 2019–20 मध्ये हा प्रकल्प पूर्ण होईल व या दरम्यान प्रकल्पावर सुमारे रु. 9007.00 कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. शासनाने कळविल्यानुसार या मेट्रो रेल प्रकल्पाचे वित्तीय आकृतीबंधामध्ये नागपूर महानगरपालिकेचा सहभाग 5 टक्के दर्शविण्यात आलेला आहे.

करीता प्रकल्प खर्चाच्या 5 टक्के खर्च म्हणजेच अंदाजीत रु. 450.35 कोटी वाटा नागपूर महानगरपालिकेने उचलण्यासंदर्भात उचीत निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयाच्या अनुषंगाने या प्रकल्पासाठी केंद्र शासनाव्दारे ज्या रक्कमेच्या किंवा खर्चाच्या डी.पी.आर. मंजूर करेल, त्या रक्कमेच्या किंवा खर्चाच्या 5 टक्के वाटा मनपा (सहभाग) वहन करण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच केंद्र शासनाव्दारे मंजूर केलेल्या डी.पी.आर. च्या रक्कमेपेक्षा किंवा मंजुरी प्रदान केलेल्या खर्चापेक्षा प्रकल्प पूर्ण करण्यास, अतिरिक्त खर्च कुठल्याही कारणास्तव लागल्यास त्या अतिरिक्त खर्चास लागणारा निधीच्या वाटा अथवा सहभाग मनपा देय करणार नाही. या अटीसह विषयास मंजुरी प्रदान करते व विषय मनपा सभागृहाच्या मंजुरीकरिता पाठविण्याची शिफारस करते.

**ठराव क्रमांक 129** :– प्रभाग क्र. 24, वायुसेना नगर अंतर्गत हजारीपहाड व भिवसेन खोरी या मुख्य रस्त्यावर नव्याने बॉक्स सेल पुलाचे बांधकामास्तव रु. 39,11,984/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे, तसेच या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. एन वास्तु, यांची म.न.पा.च्या मंजूर दरावर नेमणूक करणे व या कामास्तव एकूण रकमेच्या निविदा मागवून प्रावधानाची तरतुद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 130</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर